राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाची स्थापना करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
महिला व बाल विकास विभाग,
शासन निर्णय क्र.बाहआ-२००६/प्र.क्र.१३८/का-३,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : २४ जुलै, २००७.

**प्रस्तावना :** बाल विकास धोरण २००२ मधील तरतूदीस अनुसरुन दिनांक २४ फेब्रुवारी, २००४ रोजी राज्य मंत्रीमंडळाने राज्य बाल हक्क संरक्षण आयोग स्थापन करण्याच्या प्रस्तावास तत्वत: मान्यता दिली आहे. यानंतर शासनाद्वारे राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे अधिनियम तयार करण्याची कार्यवाही सुरु होती. दरम्यान केंद्र शासनाने बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५ दिनांक २० जानेवारी, २००६ रोजी प्रकाशित केला. या अधिनियमात राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय आयोग स्थापन करण्याची तरतूद आहे. त्यानुसार बालकांच्या सुरक्षिततेसाठी अनुकूल वातावरण तयार व्हावे व बालकांचे शोषण होऊ नये याकरीता सामाजिक जागृती व्हावी याकरीता राज्यात बाल हक्क संरक्षण आयोग गठीत करण्याचा निर्णय दिनांक २१.६.२००७ रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत शासनाने घेतला आहे.

**शासन निर्णय :-** राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाची स्थापना खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

अध्यक्ष - बालकांच्या विकासासाठी कार्य केलेली नामांकित व्यक्ती

सदस्य - ६, प्रत्येकी खालील क्षेत्रातील नामांकित व्यक्ती (किमान दोन महिला)

१. शिक्षण.
२. बालकांचे आरोग्य, काळजी, कल्याण किंवा विकास.
३. बाल न्याय क्षेत्र किंवा दुर्लक्षित मुले किंवा अपंग मुलांचे क्षेत्र.
४. बाल कामगार प्रतिबंध.
५. बाल मानसशास्त्र किंवा समाजशास्त्र.
६. बालकांच्या कायद्यांविषयीचे क्षेत्र.

२. बाल हक्क संरक्षण आयोगावरील अध्यक्ष व सदस्यांची शिफारस शासनास करण्याकरीता पुढीलप्रमाणे त्रिसदस्यीय निवड समिती गठीत करण्यात येत आहे.

18

मा.मंत्री, महिला व बाल विकास - अध्यक्ष

मा.राज्यमंत्री, महिला व बाल विकास - **सदस्य**

बालकांच्या क्षेत्रातील नामांकित सामाजिक कार्यकर्ता - **सदस्य**

३. राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे अधिकार व कार्यकक्षा **केंद्र शासनाने दिनांक** २० जानेवारी, २००६ रोजी प्रकाशित केलेला, बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम, **२००५ मधील** तरतुदींनुसार राहातील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( श.पा.वारे )**
शासनाचे उप सचिव

**प्रति,**
मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री / राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव.
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
पोलिस महासंचालक, पोलिस मुख्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ मर्या.,बांद्रा, मुंबई.
सदस्य सचिव, राज्य महिला आयोग, बांद्रा, मुंबई.
मा.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
मा.महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने )
मा.प्रबंधक, उच्च न्यायालय, खंडपीठ,नागपूर/औरंगाबाद ( पत्राने )
सर्व जिल्हा न्यायाधीश, सर्व जिल्हा न्यायालये. (पत्राने)
सचिव, महाराष्ट्र राज्य समाजकल्याण मंडळ, चेंबूर, मुंबई.
मुख्य अधिकारी, चिल्ड्रेन्स एड् सोसायटी, माटुंगा, मुंबई.
सचिव, महाराष्ट्र राज्य परिविक्षा व अनुरक्षण संघटना, पुणे.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.
सर्व उप सचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती, का-३.

अ.शा.प.क्र.एईओ-११०७/ (१०)/२००७/दहा,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
**दिनांक :- २९.११.२००७.**

वि.ना.मोरे,
सह सचिव.

प्रिय महोदया,

**सचिव, राज्य बाल हक्क संरक्षण आयोग** या नवनिर्मित पदाचा अतिरिक्त कार्यभार, पुढील आदेश होईपर्यंत, आपल्याकडे सोपविण्यात येत आहे. तरी, आपण आपल्या सध्याच्या पदाचा कार्यभार सांभाळून, सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार धारण करावा ही विनंती.

आदरपूर्वक,

आपला स्नेहांकीत,

(वि.ना.मोरे)

श्रीमती लीना मेहेंदळे,
प्रधान सचिव (सा.वि.स.),
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई.

**प्रत माहितीसाठी :-**

१. सचिव, महिला व बालकल्याण विभाग, मुंबई.
२. सचिव, राज्य बाल हक्क संरक्षण आयोग द्वारा, सचिव, महिला व बालकल्याण विभाग, मुंबई,
३. **निवड नस्ती.**